# मुंबई पोलीसांची महिलांसाठी प्रतिज्ञा
## 8 मार्च 2014

- ★ आपल्याविरुद्ध एखादा गुन्हा घडल्यास न घाबरता पोलीस ठाण्यास जा.
- ★ पोलीस ठाण्यात महिला अधिकारी आपली तात्काळ दखल घेवून तक्रार नोंदवून घेतील.
- ★ तुमची तक्रार तुम्हाला वाचून दाखवली जाईल व फिर्यादीची एक प्रत त्वरीत विनामूल्य दिली जाईल.
- ★ घटनास्थळ कोठे आहे ? याची काळजी करु नका. कोणत्याही पोलीस ठाण्यात जा. आम्ही तुमची तक्रार नोंदवून संबधित पोलीस ठाण्यास त्वरीत हस्तांतरीत करु.
- ★ तुमचा जबाब नोंदवताना तुमच्यासोबत तुमची विश्वासार्हय व्यक्ती हजर राहील.
- ★ जर तुम्ही कौटुंबिक हिंसाचाराच्या बळी असाल तर आम्ही तुमची तक्रार नोंदवून घेवू त्याचबरोबर तुम्हाला कौटुंबिक हिंसाचार कायदयाअंतर्गत कोणती मदत आणि सेवा उपलब्ध होऊ शकते याची माहिती देवू.
- ★ जर तुम्ही लैंगिक गुन्हयाच्या बळी असाल तर तुमच्यावतीने इतर कोणतीही व्यक्ती पोलीस ठाण्यास येवून तक्रार देवू शकते.
- ★ जर तुम्ही पोलीस ठाण्यास जावू इच्छित नसाल तर पोलीसांच्या 103 या हेल्पलाईनवर संपर्क करा. महिला पोलीस अधिकारी साध्या वेषात तुम्हाला सोयीस्कर ठिकाणी भेटून तुमची फिर्यादी/जबाब नोंदवतील.
- ★ जर तुम्ही स्थानिक भाषा बोलू शकत नसाल किंवा काही शारीरीक/मानसिक व्यंग असेल तर आम्ही दुभाष्या किंवा विशेष प्रशिक्षक बोलवून त्यांच्या मदतीने तुमची फिर्याद/जबाब नोंदवू.
- ★ आम्ही तुम्हाला रात्री पोलीस ठाण्यास बोलवणार नाही.
- ★ तुम्ही पोलीस ठाण्यात आल्यावर आरोपीच्या संपर्कात येणार नाही याची आम्ही दक्षता घेवू.
- ★ आम्ही तुम्हाला वैदयकिय उपचार /तपासणीसाठी रुग्णालयात घेवून जावू.
- ★ जर तुम्हाला आश्रय/निवारा हवा असेल तर तो ही मिळवून देण्यास आम्ही सहकार्य करु.

**महिला दिनाचे औचित्य साधून मुंबई पोलीस महिलांना आत्मसन्मान व आदराने वागवण्यास वचनबद्ध आहेत.**

RAHAT

Socio-legal Support for Victims-Survivors of Sexual Violence
Collaboration between Department of Women and Child Development and Majlis Legal Centre.

majlis

Legal Centre for Women